वांगारी मथाई

परिवर्तनाचे बीज

शांततेसाठी वृक्षारोपण

वांगारी मथाई

परिवर्तनाचे बीज
शांततेसाठी वृक्षारोपण

लेखिका : जेन जॉनसन

चित्रे : सोनिया लिन

मराठी अनुवाद : तृप्ती कर्णिक

“इकडे ये,” वांगारीच्या आईने हाक मारली.
पसरट खोड आणि गोलाकार पाने असलेल्या एका हिरव्यागार डेरेदार वृक्षाकडे बोट दाखवत तिने आपल्या मुलीला जवळ बोलावलं.

“अनुभव घे” आई उत्साहाने म्हणाली.
वांगारीने आपले चिमुकले हात झाडाच्या खोडाभोवती पसरले. त्या गुळगुळीत खोडावरून तिने हळुवारपणे हात फिरवला.
“हे मुंगुमोचं झाड आहे”, आईने सांगितलं. “अनेकांना हे निवारा आणि अन्न देतं.”
आईने खाली झुकलेल्या फांदीवरून एक जंगली अंजीर तोडलं आणि वांगारीला दिलं. सरडे आणि हत्तींसारखं तिनेही चवीचवीने ते फळ खाल्लं. झाडाच्या शेंड्यावर पक्षांचा किलबिलाट चालू होता. माकडांच्या उड्यांनी फांद्या सळसळत होत्या.



“केनियातील आपण किकुयू लोक असं मानतो की आपले पूर्वज ह्या झाडाच्या सावलीत निवास करतात.” आईने माहिती दिली.
वांगारीने झाडाचं खोड म्हणजे आपली पणजीच आहे असं समजून प्रेमाने घट्ट मिठी मारली. हे झाड कधीच कापायचं नाही असा तिने निश्चय केला.

दरवर्षी मुगुमोचं झाड वाढत होतं आणि बरोबरीने वांगारीही. घरातली सर्वात थोरली मुलगी असल्यानं तिला बरीच कामं करावी लागत. नदीतून ती रोज स्वच्छ आणि गोड पाणी वाहून आणायची. पावसाळ्यात रताळी, बाजरी आणि घेवडा लावायची. उन्हाळ्यात कडकडीत ऊन असलं की कोंबड्यांना सावलीत झाकून ठेवायची.

कधीकधी तिचा भाऊ देरीतू शाळेतून आला की ते दोघं झऱ्याच्या बाजूला असलेल्या आरारूटच्या शेतीत खेळत. तिकडे नुकतेच अंड्यातून बाहेर पडलेले हजारो बेडूकमासे व मोठे झालेले बेडूक असत. देरीतू वांगारीला शाळेत त्याला काय शिकवलं ते सांगायचा. “झाडांमुळेच आपण श्वास घेऊ शकतो. वीसला दोनने भागलं की दहा उत्तर येतं. जगात सात मोठे समुद्र आहेत.” तो सांगत राहायचा.

वांगारी हे सगळं जरी स्तब्ध होऊन ऐकत असली तरी तिचं मन मात्र झऱ्यातल्या पाण्यासारखं उसळ्या मारायचं. किकुयु मुलींना शाळेत पाठवण्याची पध्दत नाही हे तिला माहित होतं. तरीदेखील आपल्या भावासारखं शाळेत जायचं तिचं स्वप्न होतं.

“मला पण शाळेत जायचं आहे.” तिने भावाला सांगितलं.

“अगदी नक्की.” त्याने तिला आश्वासन दिलं.

देरीतू आई-बाबांशी बोलला. “वांगारी शाळेत का जात नाही?” त्याने विचारलं.

वांगारीच्या आई-बाबांना माहित होतं की आपली मुलगी हुशार आणि मेहनती आहे. जरी त्यावेळी मुलींना शाळेत पाठवण्याची पध्दत नव्हती तरी त्यांनी ठरवलं की वांगारीला शाळेत घालायचं. त्यांना माहित होतं की ती त्यांना निराश करणार नाही. त्यांनी तिच्या शाळेच्या फीसाठी पैसे जमवले. एक दिवस आईने तिला जवळ घेतलं आणि सांगितलं, “तू शाळेत जाणार आहेस.”

वांगारीने आनंदाने आईला मिठी मारली. “धन्यवाद!” तिला रडू आवरलं नाही. “तुम्हाला माझा अभिमान वाटेल असं काही मी करून दाखवीन.”

वांगारी शाळेकडे निघाली. मातीच्या भिंती, पत्र्याचे छप्पर आणि खडबडीत जमीन असलेली ती फक्त एका खोलीची शाळा होती. काही दिवसांतच ती अक्षरं आणि अंक लिहायला शिकली. हळूहळू अक्षरांपासून शब्द आणि शब्दांपासून वाक्यं बनवायला शिकली. तसंच तिला बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकारही जमू लागला. प्राणी आणि वनस्पतीही काही प्रमाणात माणसांप्रमाणेच आहेत. त्यांनाही अन्न, पाणी आणि पोषणाची गरज असते हे ही ती शिकली .

वांगारीचं प्राथमिक शिक्षण पूर्ण झालं. ती आता अकरा वर्षाची झाली. तिचं मन म्हणजे कुठल्याही क्षणी अंकुरेल असं कसदार मातीत पेरलेल्या बीसारखं बनलं होतं. तिला पुढे शिकायचं होतं. पण त्यासाठी तिला गाव सोडून राजधानी नैरोबीला जावं लागणार होतं. वांगारी तोपर्यंत आपलं खोरं सोडून कुठेचं गेली नव्हती. तिला भीती वाटत होती.

“खुशाल जा” तिची आई म्हणाली. तिने मुठभर माती उचलली आणि वांगारीच्या हातात दिली. “तू जिथे जाशील तिथे आम्ही तुझ्या सोबत असू.”.

वांगारीला सगळ्यांना सोडून जाणं फार जीवावर आलं होतं पण तिला आईचं पटतही होतं. ती जिकडे कुठे जाणार होती तिकडे तिचं कुटुंब, गाव आणि किकुयु संस्कार नेहमीच सोबत करणार होते. तिने आईबाबांचा निरोप घेतला. जाण्यापूर्वी मुगुमोच्या झाडालाही ती भेटली. त्याचं सदैव रक्षण करायचा तिने केलेला निश्चयही तिला आठवला.

वांगारीसाठी शहरातील आयुष्य खूपच वेगळं होतं. इकडे वर पाहिलं की झाडांऐवजी आकाशाला भिडणाऱ्या उंच इमारती दिसत. रस्त्यांवरून माणसांची गर्दी दगडांवरून नदीचं पाणी जसं सैरावैरा वाहतं तशी वाहायची. शहरात ती तिच्यासारख्याच छोट्या गावातून आलेल्या इतर मुलींसोबत राहत होती. सगळ्याजणी आपल्या गावातल्या रितीभातींसह शहरातल्या वातावरणाला जोडून घेण्याचा प्रयत्न करत होत्या. रात्री झोपल्यावर वांगारीला स्वप्नात घर आणि गोड फळं देणारं मुगुमोचं झाडं दिसायचं. ह्या स्वप्नामुळे सर्व सजीवांचा आदर करण्याचे तिच्यावरचे किकुयु संस्कार अजून घट्ट होत.

वांगारी अतिशय हुशार मुलगी होती. विज्ञान तिचा सगळ्यात आवडता विषय होता. सजीवांचा अभ्यास करायला तिला मजा यायची. हवा ऑक्सिजनच्या दोन घट्ट बांधलेल्या रेणूंपासून बनली आहे. शरीर पेशींपासून बनले आहे. पानांचा रंग प्रकाशसंश्लेषणामुळे बदलतो असं बरंच काही ती शिकली.

तिचे पदवीचे शिक्षण चालू असताना तिने आपल्या मित्र-मैत्रिणींना सांगितलं की तिला जीवशास्त्रज्ञ बनायचं आहे.

“गावातील स्त्रिया सहसा शास्त्रज्ञ बनत नाहीत.” तिचे मित्र-मैत्रिणी तिला म्हणाले.

“पण मला बनायचंच आहे” ती ठामपणे म्हणाली.

वांगारीला जीवशास्त्र शिकायला खूप लांबचा प्रवास करून अमेरिकेला जावं लागणार होतं. ती आतापर्यंत केनियाच्या बाहेर कधीही गेली नव्हती आणि तिच्याकडे फारसे पैसेही नव्हते. परंतु शिक्षकांच्या पाठिंब्याने तिने केन्ससमधील एका कॉलेजची स्कॉलरशिप मिळवली.

अमेरिका केनियापेक्षा अगदीच वेगळी होती. कॉलेजमध्ये वांगारीला अनेक स्त्रिया शिक्षिका होत्या. त्यांच्याकडे पाहून तिला कळलं की स्त्रियाही आपल्याला हवं ते करू शकतात. सूक्ष्मदर्शकाखाली रेणूंची हालचाल आणि पेशींचे निरीक्षण करता करताच तिला शास्त्रज्ञ म्हणून स्वतःतील बलस्थानंही समजली.

कॉलेजमधून पदवी घेतल्यावर ती पुढील शिक्षणासाठी पेन्सिल्वेनियाला गेली. तिथे तिला घरून आलेल्या पत्रातून केनियामध्ये झालेल्या बदलांची बातमी मिळाली. लोकांनी राष्ट्राध्यक्ष म्हणून किकुयु जमातीतील जोमो केन्यात्ता यांना निवडून आणलं होतं. तिला केनियाचा तसेच आपण एक किकुयु असल्याचा अभिमान वाटला. तिने गावी जाऊन आपल्या लोकांमध्ये काम करण्यासाठी केनियाला परतण्याचा निर्णय घेतला.

अमेरिकेत राहिल्याने वांगारीमध्ये खूप बदल झाले होते. तिथे कमावलेला आशावाद आणि अनुभवलेलं स्वातंत्र्य तिला केनियामधल्या आपल्या आया-बहिणींना सांगायचा होता. ती नैरोबी विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू झाली. तोपर्यंत स्त्रियांनी कॉलेजमध्ये शिकवणं हे दुर्मिळ चित्र होतं आणि विज्ञानासारख्या विषय तर अगदीच दुर्मिळ. वांगारीने स्त्रियाही शास्त्रज्ञ बनू शकतात हे इतर महिला व युवतींना दाखवून दिलं. महिला शास्त्रज्ञांना पुरुष शास्त्रज्ञांच्या बरोबरीचा आदर मिळावा ह्यासाठी तिने नेहमीच समानतेचा आग्रह धरला.

केनियाच्या सरकारने खूपशी जमीन परदेशी कंपन्यांना विकली होती. त्यांनी कॉफीचे मळे पिकवण्यासाठी मोठी मोठी झाडे कापून टाकली होती. सपाट केलेली जमीन पाहून वांगारीला अतीव दुःख झालं. सीडर आणि ऑकेशियासारखी स्थानिक झाडं पूर्ण नामशेष झाली होती. झाडं नसल्याने पाखरांना घरटं करायला जागा उरली नव्हती. माकडांना झोके घ्यायला काही राहिलं नव्हतं. महिलांना सरपण आणण्यासाठी लांबवर तंगडतोड करावी लागत होती.

वांगारी गावी आली. मुगुमो झाडाचं रक्षण करण्याची किकुयु प्रथा लोक विसरून गेले होते हे पाहून तिला मोठा धक्का बसला. झाडं मुळासकट उपटून टाकली होती. माती नदीत वाहून गेली होती. जिथे एकेकाळी मका, केळी, बटाटे पिकायचे तिथे सगळं ओसाड रान झालं होतं. अनेक कुटुंबांची उपासमार होत होती.

उध्वस्त झालेला परिसर पाहून वांगारी कमालीची अस्वस्थ झाली. वांगारी आता तीन मुलांची आई झालेली होती. पूर्णतः शेतीवर अवलंबून असलेली आया-मुलं कशी काय जगत असतील ह्या विचाराने ती काळजीत पडली.
“आपल्याला आता काहीतरी करायलाच पाहिजे”, वांगारी पुटपुटली.

वांगारीला एक कल्पना सुचली. ही कल्पना बिजासारखी छोटी जरी असली तरी झाडासारखी आकाशाला स्पर्श करणारी होती. तिने आपल्या आया-बहिणींना गोळा केलं आणि म्हणाली, “चला, आपल्याला एकत्र काम करायचं आहे.” वांगारीने खोल खड्डा खणला, रोपटं हातात घेऊन ती म्हणाली, “आपल्याला झाडं लावायची आहेत”.

अनेक बायांनी तिचं ऐकलं आणि त्यांनी रोपं लावली. काही पुरुष मात्र उपहासाने हसले आणि म्हणाले झाडं लावणं हे बायकांचं काम आहे. काही पुरुष म्हणाले की वांगारी जास्त शिकून ज्यादा शहाणी झाली आहे आणि जरा जास्तच बोलतेय.

वांगारीने असे टोमणे मारणाऱ्या लोकांकडे पूर्ण कानाडोळा केला. त्यांना ती स्पष्टच म्हणाली की “तुम्ही जी झाडं तोडली ती मुळात तुम्ही लावली नव्हती तर तुमच्या वाड-वडिलांनी लावली होती. तुम्हीही तुमच्या पुढच्या पिढीसाठी झाडं लावा. सूर्यप्रकाश, चांगली माती आणि पावसाच्या पाण्याने जसं रोप तरारून निघतं तसंच पुढच्या पिढीचं भविष्यही अंकुरेल आणि आशेची किरणं सूर्याला गवसणी घालतील.”



वांगारी रोपं, बियाणं, कुदळ, फावडं घेऊन अनेक गावं, तालुके, शहरं फिरली. ती जिथेजिथे गेली तिथेतिथे स्त्रियांनी ओळीने झाडं लावली. हळूहळू जमिनीभोवती हिरवागार पट्टा दिसू लागला. त्यामुळे त्यांनी आपल्या कामाला "ग्रीन बेल्ट मुव्हमेंट" असे नाव दिलं.

"जग बदलणं आपल्या हातात नाही पण जंगलं मात्र आपण नक्कीच सुंदर करू शकू." ती म्हणाली.

हळूहळू एका झाडाची दहा, दहाची शंभर, शंभराची लाख होत तब्बल तीस लाख झाडं लावली गेली. केनियाची भूमी पुन्हा हिरवीगार झाली. पक्षांनी नवीन झाडांवर घरटी बांधली, माकडांच्या झोक्यानी फांद्या सळसळू लागल्या, नद्यात नितळ पाणी वाहू लागलं आणि मुंगुमोची झाडं जंगली अंजीरांनी लगडून गेली.



आया मुलांना पोट तुडुंब भरेल इतका मका,
केळी आणि बटाटा भरवू लागल्या.

केनियामध्ये ग्रीन बेल्ट मूव्हमेंट सगळीकडे फोफावू लागली. त्यामुळे काही धनदांडगे अडचणीत आले. आणखीन कॉफीचे मळे आणि वखारीसाठी लाकडं हवी असणारे लोभी परदेशी व्यापारी विचारू लागले, “एक रोपट्याने लोकांचं आयुष्य बदलणारी ही बाई आहे तरी कोण? झाडांसाठी आम्ही का म्हणून आमची जागा आणि पैसा द्यायचा?

वांगारीला थोपवण्यासाठी त्यांनी एक कारस्थान रचलं.

एक दिवस वांगारी झाड लावत असताना काही श्रीमंत व्यापाऱ्यांनी पोलिसांना लाच देऊन तिला अटक केली.

तुरुंगामध्ये वांगारी प्रार्थना करायची. वादळवाऱ्याला तोंड देण्याऱ्या भक्कम झाडासारखं तिचं मन कणखर बनलं होतं. तिने तुरुंगामध्ये इतर महिला कैद्यांशी मैत्री केली. त्यांनी तिला त्यांच्या कहाण्या सांगितल्या. तिने त्यांना बिया, रोपटी आणि तिच्या कामाची माहिती दिली. एकमेकींपासून त्या शिकत होत्या.

वांगारीचा केनियामधील तसेच इतर देशातील अनेक लोकांशी परिचय होता. तिची सुटका करण्यासाठी ते एकत्र आले. तिची तुरुंगातून सुटका झाली. बाहेर आल्यावर इतर महिला कैद्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्याचा तिने निश्चय केला.

ज्यांनी आपल्याला तुरुंगात डांबलं त्यांना आपल्या भागात झालेला तसेच स्त्रियांमध्ये झालेला बदल रुचलेला नाही हे वांगारीला कळून चुकलं होतं. मोठ्या कंपनीच्या मालकांना सर्व जमीन स्वतःसाठी हडप करायची होती. आणि सरकारला स्त्रिया धीट होतील ह्याची भीती वाटत होती. जर आपल्या देशाला आणि देशबांधवाना वाचवायचं असेल तर बाहेर पडून जगाला आपल्या कामाची माहिती देण्याची गरज आहे असं तिला वाटलं. त्यासाठी पुन्हा एकदा तिला आपलं घर सोडावं लागणार होतं.

वांगारी प्रवासाला निघाली. ती अनेक देशातले शिक्षक, राष्ट्राध्यक्ष, शेतकरी, राजदूत, शाळेतील विद्यार्थी ह्यांना भेटली आणि तिच्या कामाबद्दल माहिती दिली. ती चिखलात खड्डा खणायची, त्यात रोपटं लावायची आणि स्त्रियांच्या हक्कांबद्दल बोलायची. भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात तिने परिवर्तनाचं बीज रोवलं.

दरम्यान केनियामध्ये बरेच बदल झाले. आता पुष्कळ लोकांना तिच्या कामाचं महत्व पटलं. ते तिला मामा मिती म्हणजेच वृक्षांची माय असं संबोधू लागले. तिने केनियामध्ये नव्याने स्थापन झालेल्या लोकशाहीत नेतृत्व करावं असं त्यांना वाटत होतं. ती केनियाच्या संसदेवर निवडून आली आणि पर्यावरण मंत्री बनली.

तिचं झाडं लावण्याचं काम मात्र एकीकडे चालूच होतं.

२००४ साली वांगारीला अतिशय मानाचं प्रतिष्ठेचं असं शांततेचं नोबेल पारितोषक मिळालं. हा सन्मान मिळालेली ती आफ्रिकेतील पहिली महिला तसंच पहिली पर्यावरणतज्ञ ठरली.

जगभरातल्या मान्यवरांसमोर जेव्हा ती भाषण करायला उभी राहिली तेव्हा तिला लहानपणीची मुगुमो झाडाची गोष्ट आठवली. तिला समजलं की सातत्य, सहनशीलता आणि झोकून काम करणं मुलांच्या मनामध्ये एखाद्या बीजाप्रमाणे रुजवलं पाहिजे. हा विचार बीजाप्रमाणे छोटा असला तरी झाडाप्रमाणे आकाशाला गवसणी घालणारा आहे. “बाळांनो, तुम्हीच आमची आशा आणि भविष्य आहात”, तिने मुलांना उद्देशून म्हटलं.

भाषण संपताच ती सतत करत असलेली कृती तिने केली. तिने एक रोप लावलं.



समाप्त